Amar Shikshan Prasarak Sanstha's

# Shri Vasantrao Naik Arts & Amarsingh Naik Commerce College

## Mangrulpir Dist. Washim – 444403 (Maharashtra)

(NAAC Accredited with 'B' Grade CGPA 2.02)

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

## ☯ Two Days Multidisciplinary National Conference ☯

**On**

## RECENT TRENDS IN INDUSTRY AND COMMERCE

Sponsored by ICSSR, Mumbai, On 22nd and 23rd March 2024

# CERTIFICATE

This is to Certify that, Dr./Prof./Mr./Mrs./Ms. Dr. Tai Babarao Uke

has participated and presented a paper entitled 'जिएसटी' प्रगती व विकासासाठी नवे आर्थिक स्वातंत्र्य.

ICSSR, Mumbai Sponsored Two Days Multidisciplinary National Conference on 'Recent Trends in Industry and Commerce' organized by Dept. of Commerce & Management, Shri V. N. Arts & A. N. Commerce College, Mangrulpir held on 22nd and 23rd March 2024.

पार्थ ग्राफिक्स ९८२१७८३०७४

**Dr. L. S. Hurne**
Co-Convenor

**Dr. S. M. Vadgule**
Principal& Convenor

ISSN : 2347-4777

# INTERNATIONAL JOURNAL OF CULTURAL STUDIES AND SOCIAL SCIENCES

(UGC approved Multi-disciplinary Peer-Reviewed Journal)
UGC Journal Serial No.49228 in 2019 list
Currently Indexed in UGC CARE LIST, Serial No.159 in 2022 list

Vol-20, Issue-1, No.20, January - June: 2024



Eds.
Amitava Roy, Ronan Paterson,
Bryan Reynolds, Subir Dhar, Papia Mitra

A Special Publication of
Tagore Gandhi Institute
The Shakespeare Society of Eastern India.

# Index


| S.No. | Title of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1 | INTERNATIONAL BUSINESS & ENVIRONMENT MANAGEMENT | 1 |
| 2 | समकालीन मराठी कादंबऱ्यामधील सामाजिक वातावरण एक मूल्यमापन | 8 |
| 3 | वीट भट्टी व्यवसायातील असंघटित कामगारांचा समस्या एक अभ्यास | 10 |
| 4 | मानवी भांडवल निर्मिती भारतापुढील आव्हाने आणि संधि | 14 |
| 5 | भाववाढ आणि भारतीय रिझर्व बँक (RBI) : एक अध्ययन | 18 |
| 6 | महानुभाव पंथप्रवर्तक श्री. चक्रधरस्वामीचे समाजिक व धार्मिक कार्य | 23 |
| 7 | धर्मदाय विश्वस्त संस्था कायद्यांतर्गत स्थापन झालेल्या ग्रामीण रुग्णालयातील मानवी संसाधन व्यवस्थापनाची गरज व कार्य | 25 |
| 8 | नवदोत्तर ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा (कथा, कविता ,कादंबरी) | 31 |
| 9 | भारत देशात मोफत सक्तीच्या शिक्षणाचा इतिहास | 37 |
| 10 | बचत आणि गुंतवणूक परस्पर संबंधविषयक दृष्टीकोन | 44 |
| 11 | अकोला जिल्ह्यातील मानवी विकास निर्देशांक ट्रेंड आणि विषमतेचे विश्लेषण: एक सामाजिक-आर्थिक दृष्टीकोन | 52 |
| 12 | भारतातील बाजारपेठेवर ई-कॉमर्सचा होणा-या परिणामाचे अध्ययन | 60 |
| 13 | 'जीएसटी' प्रगती व विकासासाठी नवे आर्थिक स्वातंत्र्य | 66 |
| 14 | भारतातील स्टार्ट-अप वित्तीय मदत आणि आव्हाने | 69 |
| 15 | भारतीय संविधानातील राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्वाचे महत्व व कामगिरी | 74 |
| 16 | दलित साहित्य : एक चिंतन | 77 |
| 17 | मंगरूळपीर शहराच्या आर्थिक विकासात नागरी सहकारी बॅकांचे योगदान | 85 |
| 18 | मानव संसाधन व्यवस्थापन आणि विकास : एक सर्वसमावेशक दृष्टीकोन | 88 |
| 19 | ग्रामीण महिलांचे सामाजिक सक्षमीकरण: समस्या व उपाय | 92 |
| 0 | महाराष्ट्रातील मराठा जातीच्या सामाजिक व राजकीय स्थितीचा अभ्यास | 97 |
| | भारतातील स्फिती आणि आर. बी. आय. ची भुमिका | 103 |
| | बारोमास – एक ग्रामीण वास्तव | 107 |
| | महाविद्यालयीन ग्रंथालयातील प्रेरक उपक्रमांचा अभ्यास | 113 |
| | A CRITICAL FINANCIAL ANALYSIS OF INFRASTRUCTURAL DEVELOPMENT IN YAVATMAL DISTRICT THROUGH THE PRADHAN MANTRI AWAS YOJANA IN PUSAD | 118 |

# 'जीएसटी' प्रगती व विकासासाठी नवे आर्थिक स्वातंत्र्य

**डॉ. ताई बाबाराव उके** प्राध्यापक आणि वाणिज्य विभाग प्रमुख मोबाईल नंबर- 9518573710, 9325515532 Email id:- uketaib@gmail.com श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय, अंजनगाव सुर्जी जि. अमरावती

सारांश:

'एक राष्ट्र, एक कर' या संकल्पनेनुसार शनिवार १ जुलैपासून जीएसटी च्या रूपाने देशात एक नवी कर प्रणाली लागू झाली. मध्यरात्री राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री अरुण जेटली यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळ आणि देशभरातील विविध राज्यांच्या मंत्र्यांचे उपस्थितीत रंगलेल्या सोहळ्यात ही ऐतिहासिक कर प्रणाली देशभर लागू करण्यात आली. भारतासारख्या विकसनशील देशात स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी कर सुधारणा आहे. किंबहुना सरकारने टाकलेले महत्वाचे पाऊल सुद्धा आहे. आतापर्यंत प्रत्येक राज्यात एकाच वस्तूच्या विविध किमती आकारल्या जात होत्या. परंतु देश पातळीवर आता प्रत्येक वस्तूची एकच किंमत सर्वत्र असणार आहे. ५ टक्के १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के असे चार टप्पे जीएसटी अंतर्गत असणार आहेत. त्यानुसार वस्तू आणि सेवांवर कर आकारले जाणार आहेत. सरकारने जीवनावश्यक वस्तूंना या करातून बाहेर ठेवत सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे, तर गृहपयोगी वस्तूंना ५ आणि १२ टक्के कराच्या टप्प्यात ठेवले आहे. चैनीच्या वस्तूंवर २८ टक्के कर आकारला जाणार आहे. मदय आणि इंधन मात्र जीएसटीत समाविष्ट करण्यात आलेले नाही.

बीज शब्द:- सेवा, वस्तू, कर, ग्राहक

प्रस्तावना :-

केंद्र सरकारने १ जुलैपासून जीएसटी ची अंमलबजावणी होणार, असे जाहीर केले तेव्हापासून यावर टीका होत गेली, तर काहींनी समर्थन देखील केले. जीएसटी चा प्रत्येकाच्या आयुष्यावर परिणाम होणार आहे. व्यापारी, ग्राहक, किमती आणि सरकारी महसूल सर्वांवरच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होणार असला तरी ही कर प्रणाली नेमकी असणार तरी कशी? असा प्रश्न सर्वांसमोर आहे. काहींना तर जीएसटी म्हणजे काय? असा प्रश्न देखील पडला होता. देशात आतापर्यंत अनेक प्रकारचे कर लावले जात होते. सध्या केंद्र आणि राज्य सरकारांचे मिळून २० हून अधिक विविध कर करदात्याला भरावे लागत आहेत. यामध्ये सेंट्रल सेल्स टॅक्स, सेवा कर, एक्साईज टॅक्स, लक्झरी टॅक्स, मनोरंजन कर, व्हॅट यांचा समावेश होता. परंतु यापुढे हे सर्व कर रद्द होणार असून त्यांच्या जागी केवळ जीएसटी म्हणजेच वस्तू आणि सेवा कर हा संपूर्ण देशभरात लागू होणार आहे. ही कर प्रणाली लागू झाल्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारला यातील समान वाटा मिळणार आहे. या कर प्रणालीमुळे करचुकव्यांना चाप बसणार असून राज्य सरकार तसेच सर्वसामान्यांना यामुळे कोणताही त्रास होणार नाही. जीएसटी मुळे आता करदात्यांना सेंट्रल जीएसटी, स्टेट जीएसटी आणि इंटिग्रेटेड (एकत्रित) जीएसटी असे फक्त तीन टॅक्सेस भरावे लागणार आहेत. त्यातील पहिला असणारा सेंट्रल जीएसटी हा कर केंद्र सरकार वसूल करणार आहे. तर दुसरा स्टेट जीएसटी हा कर राज्य सरकारे त्यांच्या राज्यातील करदात्यांकडून वसूल करणार आहेत. तर तिसरा इंटिग्रेटेड (एकत्रित) जीएसटी हा दोन राज्यातील व्यापारावर लागू होणार आहे. गुड्स अँण्डा टॅक्स नेटवर्क म्हणजे जीएसटीएन ही एक बिगर सरकारी नॉन प्रॉफिट संस्था असणार आहे आणि या संस्थेकडे जीएसटी चा सगळा डाटा असणार आहे. स्टॉकहोल्डर्स, टॅक्सपेयर्स आणि सरकार या तिघांनाही लागणाऱ्या माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा जीएसटीएन पुरवणार आहे. जीएसटीचे रजिस्ट्रेशन, टर्न फाईल करणे इत्यादी महत्वाची कामे जीएसटीएन करणार आहे. जीएसटीएनमध्ये केंद्र सरकारचा २४.५ टक्के, तर राज्य सरकार आणि राज्यांच्या वित्त समित्यांचा २४.५ टक्के वाटा असणार आहे. आयसीआयसीआय आणि एचडीएफसी सारख्या बँकांचा १०-१० टक्के वाटा असेल, तर एनएसई स्ट्रॅटेजिक इन्व्हेस्टमेंट कंपनीचा ११ आणि एलआयसीचा १० टक्के वाटा असणार आहे. जीएसटी अंतर्गत कराचे चार टप्पे करण्यात आले आहेत. ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के अशी कर रचना आता अमलात येणार आहे. सरकारने ठरवून दिलेल्या वस्तूंना त्या त्या पद्धतीने आता कर लावले जाणार आहेत. यामध्ये सेवा आणि वस्तू अशा प्रकारे विभागणी देखील करण्यात आली आहे. त्यानुसार कर आकारणी केली आहे, जीएसटी मुळे काही वस्तू महाग होणार आहेत, तर काही स्वस्त होणार आहेत. बँकिंग, टेलिकॉम सेवा, फ्लॅट, तयार कपडे, महिन्याची मोबाईल बिल आणि ट्युशन फी महागणार आहे. त्याचबरोबर एसी रेस्टॉरंट मधले खानपान महागणार आहे, एसी रेस्टॉरंटमध्ये १८ टक्के कर भरावा लागेल, तर नॉन एसी रेस्टॉरंटमध्ये १२ टक्के, कर दयावा लागणार आहे. मोबाईल बिल, सलून, टयूशन फी महागणार आहे. आता या सेवांवर १८ टक्के कर लागणार आहग. पूर्वी या सेवांवर १५ टक्के सेवा कर द्यावा लागत होता, एक हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कपड्यांवर १२ टक्के कर द्यावा लागणार आहे. पूर्वी राज्य सरकारचा सहा टक्के व्हॅट भरावा लागत होता. एक हजार पेक्षा कमी किमतीच्या कपड्यांवर पाच टक्के कर द्यावा लागणार आहे. फ्लॅट किंवा दुकान खरेदीवर १२ टक्के कर भरावा लागेल. सध्या सहा टक्के कर द्यावा लागत होता.

**संशोधन पद्धती:** वेगवेगळी पुस्तक, वर्तमान पेपर आणि वेबसाईटवरून माहिती घेऊन पेपर लिहिला आहे.

**जीएसटी चे टप्पे:-**

**१) ५ टक्के अंतर्गत येणाऱ्या सेवा आणि वस्तू:-**

रेल्वे, विमानाची तिकिटे, ओला - उबर आदी टॅक्सी सेवा, लहान रेस्टॉरंट्स (५० लाखापेक्षा कमी उलाढाल), बायोगॅस प्रकल्प, पवनचक्क्या, कपडे (१००० पेक्षा कमी किमतीचे), पादत्राणे (५०० पेक्षा कमी किमतीचे), ब्रँडेड पनीर, चहा - कॉफी, मसाले, कोळसा - केरोसीन, स्टंट - औषधे, लाईफ बोट, काजू, इन्सुलिन, अगरबत्ती, पतंग आदी.

**२) १२ टक्के अंतर्गत येणाऱ्या सेवा आणि वस्तू:-**

विमानाची तिकिटे (बिझिनेस क्लास), नॉन एसी हॉटेल्स, खते, वर्क कॉन्ट्रॅक्टस आणि वस्तू क्षेत्रातील आयुर्वेदिक औषधे, चित्रकलेची पुस्तके, रंगवायची पुस्तके, दूध पावडर, छत्र्या, बटर, शिवण यंत्रे, चीज - तूप, मोबाईल फोन, फळांची ज्यूस, दुधाच्या बाटल्या, नमकीन, पेन्सिल - शार्पनर, ड्राय फ्रुट्स (हवाबंद), सायकल, ॲनिमल फॅट, कॉन्टॅक्ट लेन्स, सॉसेजेस, भांडी, शीतबंद मांस, खेळाचे साहित्य इत्यादी.

**३) १८ टक्के अंतर्गत येणाऱ्या सेवा आणि वस्तू:-**

ब्रँडेड कपडे, मदय परवाना असलेली एसी हॉटेल्स, दूरसंचार सेवा, आयटी सेवा, आर्थिक सेवा तसेच सुगंधित साखर, पास्ता, कॉम्प्लेक्स, पेस्ट्रीज - केक्स, शीतबंद भाज्या, जाम – सास - सूप, इन्स्टंट फूड मिक्स, आईस क्रीम, मिनरल वॉटर, एलपीजी स्टोव्ह, हेल्मेटस, टिशू पेपर, नॅपकिन्स, पाकिटे - वह्या, स्टीलची उत्पादने, प्रिंटेड सर्किट्स, कॅमेरा, स्पीकर्स, मॉनिटरस, इलेक्ट्रॉनिक खेळणी आदी.

**४) २८ टक्के अंतर्गत येणाऱ्या सेवा आणि वस्तू:-**

पंचतारांकित हॉटेल्स, रेसक्लब बेटिंग आणि चित्रपटाची तिकिटे (सेवा), च्युइंग गम , वेफर्स, पान मसाला, शीतपेये, रंग, शेव्हिंग क्रीम – ऑप्टार शेव्हा डिओडरंट, शांपू – हेअर डाय, सन स्क्रीन, वॉलपेपर, टाइल्स, वाटर हीटर, डिश वॉशर, वजन काटा, वाशिंग मशीन, एटीएम, व्हॅक्युम क्लिनर, शेव्हार्स हेअर क्लीपर्स, ऑटोमोबाईल, मोटर सायकल्सा आदी.

करमुक्त असलेल्या सेवा आणि वस्तू:-

इकॉनॉमी हॉटेल्स, १००० रुपयांपेक्षा कमी भाडे असलेली हॉटेल्स आणि लॉजेस, बिंदी - कुंकू, ताजे मास, कच्चे मासे, स्टॅम्प्स, नाईक कागदपत्रे, कच्चे चिकन, छापील पुस्तके, अंडी, वृत्तपत्रे, फळे - भाज्या, काचेच्या बांगड्या, दूध – दही - ताक, मध – मीठ - पाव, खादी, बेसन आटा, मेट्रो - लोकल ट्रेन आदी.

काय महाग, काय स्वस्त?

वस्तू व सेवा कर (जीएसटी) शुक्रवारपासून लागू झाले. जीएसटी मुळे आता देशभरात एक कर व्यवस्था प्रत्यक्षात आली आहे. यामुळे अनेक वस्तूंच्या किमती कमी झाल्या, तर काही महागल्या आहेत. जीएसटी नुसार अन्नधान्य, दूध, अंडी आणि मीठ आदीसह अनेक जीवनावश्यक वस्तूंवर कर लागणार नाही. पण बँकिंग आणि वित्तीय सेवा महाग होणार आहे. यापुढे हॉटेलिंग महागणार आहे. रेस्टॉरंट मध्ये जेवण करण्यासाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागणार आहेत. नॉन एसी रेस्टॉरंट मध्ये बिलावर १२ टक्के कर, एसी रेस्टॉरंट आणि दारू पिण्याचा परवाना असलेल्या रेस्टॉरंट मध्ये १८ टक्के कर, तर पंचतारांकित हॉटेलातील बिलांवर २८ टक्के कर लागणार आहे. त्यामुळे हॉटेलातील जेवण महाग होणार आहे. मोबाईल फोन महागणार आहेत. मोबाईल बिलही मागणार आहेत. क्रेडिट कार्ड पेमेंट ही महागणार आहेत. सोने खरेदी ही महागणार आहे. तर पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि मदय जीएसटीतून वगळण्यात आले आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, सिलेंडर आणि मदयांवर जीएसटी चा काही परिणाम होणार नाही. म्हणजे ज्या किंमती आहेत, त्या कायम राहणार आहेत.

स्वस्त झालेल्या वस्तू:-

केश तेल, साबण, टूथपेस्ट, झाडू, मेणबत्ती, बिस्किटे, चॉकलेट, मिठाई, चहा - कॉफी, साखर, टीव्ही, वाशिंग मशीन, स्मार्टफोन, ॲल्युमिनियमची भांडी, तांब्याची भांडी, खते, सिनेमा - नाटकाची तिकिटे, दुचाकी आलेशान कार, प्राथमिक कार फर्निचर, खाजगी टॅक्सी सेवा, दूध, धान्य, भाज्या, फळे इत्यादी.

महाग झालेल्या वस्तू:-

मोबाईल बिल, वाय - फाय सेवा, डीटीएच सेवा, कुरियर सेवा, आयुर्विमा पॉलिसी, बँकिंग सेवा, गुंतवणूक व्यवस्थापन सेवा, तिकिटांचे ऑनलाईन बुकिंग, घर भाडे, आरोग्य सेवा, शाळेची फी, मेट्रोचा प्रवास, पेये, शाम्पू, उत्तरे, सोने, सिगारेट, पान मसाला, बटर, चीज, सुकामेवा, रेझर, मनगटी घड्याळ, व्हिडिओ गेम्स, स्टोव्हा, इलेक्ट्रिक हॉट प्लेट, वॉलपेपर, प्लास्टर, टायर, प्लास्टिक वस्तू आदी.

रासायनिक खतांवर १२ ऐवजी ५ टक्के जीएसटी:-

ऐतिहासिक जीएसटीची घोषणा होण्यापूर्वी सायंकाळी ७.०० वाजता जीएसटी कौन्सिलिंग ची बैठक झाली. या बैठकीत रासायनिक खतांवर निश्चित केलेला १२ टक्के जीएसटी कमी करून ५ टक्क्यांवर आणल्यावर शिक्का मोर्तब झाले. या विरोधात देशभरातील शेतकरी संघटना व फर्टीलायझर कंपन्यांनी नाराजी व्यक्त केली होती. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

देशाच्या विकासात आमुलाग्र परिवर्तन: मुख्यमंत्री फडणवीस:-

देशात वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू होणे हे ऐतिहासिक घटना असून यामुळे एक देश, एक कर, एक बाजारपेठ ही

रचना अस्तित्वात येणार आहे. या निर्णयामुळे देशाच्या विकासात आमूलाग्र परिवर्तन होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे व्यापारात अधिक सुलभता येईल. यामुळे महाराष्ट्राला तर लाभ होणारच आहे, पण इतर अनेक राज्यांचाही यामुळे लक्षणीय विकास होऊन अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. निरनिराळ्या प्रकारच्या करांमुळे व्यापार क्षेत्र यापूर्वी अडचणीत होते. जीएसटी मुळे सर्व कर संपुष्टात येऊन देशात एकच कर प्रणाली लागू होईल. व्यापार क्षेत्रात देशाच्या विकासाला यामुळे मोठी गती मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

दोन नंबरचे काम करणारे जीएसटी मुळे संपणार:-गडकरी-

जीएसटीद्वारे आम्ही अर्थव्यवस्थेला पहिल्या क्रमांकावर आणत असून यामुळे व्यापार उद्योगांमध्ये दोन नंबरचे काम करणारे संपणार आहेत, असे सांगत केंद्रीय वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी महागाई वाढणार असल्याचा अंदाज व आक्षेप मात्र पूर्णपणे फेटाळून लावला. व्यापारी बंधूंनी दोन महिने थांबावे. त्यांना काही त्रास झाला तर आमच्याकडे यावे. आमची काही चूक झाली असेल तर आम्ही ती सुधारू असे गडकरी यांनी स्पष्टपणे सांगितले. महागाई वाढणार असल्याचा अंदाज जो कोणी वर्तवत आहेत, त्याबाबत ते म्हणाले की, ज्या वस्तूंवर २८ टक्के कर (जीएसटी) लावण्यात आला आहे अशा वस्तूंवर या आधी १७ टक्के कर व २२ टक्के सेस मिळून एकूण किती कर लावला जात होता. जर त्या वेळच्या या करात व जीएसटी मध्ये जास्त फरक असेल तर असे म्हणता येईल की, जीएसटी मुळे ती वस्तू महाग झाली आहे. आम्ही प्रसार माध्यमांच्या दबावाखाली काम करणार नाही, असे सांगत केवळ प्रसारमाध्यम नाही तर अन्य कोणत्याही क्षेत्राच्या दबावाखाली आपण काम करत नसल्याचे त्यांनी सांगित

शंकांचे निरसन करण्यासाठी कॉल सेंटर: मुनगंटीवार

वस्तू व सेवा कर प्रणाली (जीएसटी) लागू झाल्यानंतर सर्वसामान्यांना तसेच उद्योजक - व्यापारी यांना येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विक्रीकर विभागाने कॉल सेंटर सुरू केले या दूरध्वनी क्रमांकावर महाराष्ट्रातील कोणीही व्यक्ती संपर्क साधून जीएसटी बाबत आपल्या प्रश्नांची उत्तरे प्राप्त करू शकते, अशी माहिती अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

निष्कर्ष:-

१) आतापर्यंत प्रत्येक राज्यात एकाच वस्तूच्या विविध किमती आकारल्या जात होत्या परंतु देश पातळीवर आता प्रत्येक वस्तूची एकच किंमत सर्वत्र असणार आहे.
२) एकच कर व्यवस्था अमलात आली आहे.
३) देशात एक नवी कर प्रणाली सुरू झाली आहे.
४) जीएसटी मुळे देशाच्या विकासाला गती मिळणार आहे.
५) जीएसटी कर प्रणालीमुळे उद्योगांमध्ये दोन नंबरचे काम करणारे संपणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची:-

१) दैनिक देशोन्नती
२) दैनिक पुण्यनगरी
३) wwwgoogle.com